क्रमांक:एनजीसी/१९९९/२५%५०%७५%१००%/पुणे/मवि-१,
शिक्षण संचालनालय, [उच्च शिक्षण],
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

दिनांक:- २८.१.२०००.

संदर्भ:- १] शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२०९१/[३५६७]/विशि-२अ, दिनांक ८.८.९१

२] शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/१०९३/[५९१८]/मशि-३, दिनांक १९.६.९५

३] शासन परिपत्रक क्रमांक मुविसं/११९६/[विसअ]/[५०१/९६]/मशि-३, दिनांक ५.६.९६

४] महसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्रमांक २६८५, दिनांक ४.९.९९, पत्र क्रमांक २८३५, दिनांक २१.९.९९, पत्र क्रमांक २६८८, दिनांक ६.९.९९, पत्र क्रमांक २७०८, दिनांक ७.९.९९

आदेश:-
====

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, निर्णय क्रमांक एनजीसी-२०९३/[४७७७]/युएनआय-२अ, दिनांक १८.१०.९३ अन्वये शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये महसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडील प्रस्तावात केलेली शिफारस विचारात घेऊन खालीलप्रमाणे १९९९-२००० मध्ये अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे:-

१. परिशिष्ट "अ" प्रमाणे ५०% अनुदान.

२. परिशिष्ट "ब" प्रमाणे ७५% अनुदान.

३. परिशिष्ट "क" प्रमाणे १००% अनुदान.

परिशिष्ट "क" मधील ज्या महाविद्यालयातील विद्याशाखांना सन १९९९-२००० पासून १००% अनुदान मंजूर करण्यात आले, त्या विद्याशाखांना सन १९९९-२००० च्या मान्य खर्चावर सन २०००-२००१ पासून वेतनेतर अनुदान देय होईल.

विभागीय महसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी अनुदान निर्धारण करुन ते अदा करण्यापूर्वी खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याची खातरजमा करुन घ्यावी.

31-1-2000

.. २ ..

या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे, त्या विद्याशाखेमध्ये परीक्षेला प्रथम वर्षी प्रत्यक्ष बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विद्यापीठाच्या निकालपत्रावरून तपासून घ्यावी व ती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी, नंतरच अनुदान निर्धारण करून अनुदान अदा करण्यात यावे.

१] या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, त्या प्रत्येक विद्याशाखेतील प्रथम, द्वितीय व तृतिय वर्षातील प्रत्येक विषयासाठी शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१०९३/[५९१८]/मशि-३, दिनांक १२ जून १९९५ व शासन निर्णय दिनांक १७ मार्च १९९९ अन्वये खालीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | शहरी भाग | : २४ विद्यार्थी |
| २. | आदिवासी व दुर्गम विभागातील मुलामुलींची महाविद्यालये, ग्रामीण विभागातील महाविद्यालये आणि ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरातील महिला महाविद्यालये व "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालये. | : १० विद्यार्थी |

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी अनुदान निर्धारणाच्या वेळी प्रत्येक विषयासाठी वरीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध आहेत किंवा कसे याची खात्री करून घ्यावी व त्यानंतर त्या विषयासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या वेतनावरील खर्चावर अनुदान मंजूर करून अदा करावे.

२] अनुदान निर्धारण करतांना फक्त शासनाने मान्यता दिलेल्या तुकड्याच विचारात घ्याव्यात.

३] जी विद्याशाखा अनुदानावर आणली आहे त्या विद्याशाखेचा कार्यभार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी तपासून नियमानुसार शिक्षक व शिक्षकेतरांची पदे मंजूर करावीत.

४] महाविद्यालयास/विद्याशाखेस अनुदान मंजूर केल्यामुळे जी पदे निर्माण होतील त्या पदांवर संबंधित विषयांच्या अतिरिक्त शिक्षकांना शासनाच्या निर्णयाप्रमाणे सामावून घ्यावे.

५] अनुदान निर्धारण करतांना विद्यापीठाने व शासनाने त्या संबंधित महाविद्यालयांच्या विद्याशाखांना व तुकड्यांना संलग्नीकरण मंजूर केल्याची खात्री करुन घ्यावी.

६] शिक्षक व शिक्षकेतर पदांवरील नियुक्त केलेले कर्मचारी शासनाच्या व विद्यापीठांच्या आदेशानुसार सेवाप्रवेशाच्या अटी पूर्ण करणारे असावेत. शिक्षक संवर्गातील नेमणूकींना विद्यापीठाची मान्यता प्रदान केलेली असावी. मागासवर्गीय संवर्गाच्या आरक्षणाबाबत असलेल्या तरतुदींचे पालन करावे.

७] शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१९७७/१२२१६६/३२/सेल, दिनांक २१.९.१९७७ व शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/१०९६/८१५८/४१२६/विशि-४, दिनांक १२.४.१९९७ अन्वये महाविद्यालयास देण्यात येणारा वेतनाचा धनादेश बँकेत वेतन खात्यात जमा करण्यात येत असले, त्याच बँकेत त्या महाविद्यालयातील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांचे वैयक्तिक खाते उघडणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे महाविद्यालयाचे बँकेत जमा होणा-या वेतनाच्या रकमेतूनच संबंधित कर्मचा-यांच्या खाती नियमाप्रमाणे वेतनाची रक्कम ट्रान्स्फर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे संबंधित महाविद्यालये काटेकोरपणे कार्यवाही करीत आहे, याची खात्री करुन घ्यावी.

८] महाविद्यालयांच्या मान्यतेबाबत/संलग्नीकरणाबाबत शासनाने/विद्यापीठाने विहित केलेल्या सर्व अटींची पूर्तता केली आहे.

९] संबंधित महाविद्यालयांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या/करणा-या आदेशांचे पालन करणे आवश्यक आहे.

१०] ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची नेमणूक केली आहे ते शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी उच्च माध्यमिक विद्यालयात/माध्यमिक शाळेत संस्थेत पूर्णवेळ किंवा अर्धवेळ काम करीत नाही.

११] संस्थेने महाविद्यालयासाठी स्वत:च्या मालकीच्या पुरेशा इमारतींची वर्गखोल्या व इतर भौतिक सुविधांची सोय उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

१२] विद्यापीठाची रितसर परवानगी घेऊन पूर्णवेळ प्राचार्यांची निवड समितीद्वारा नेमणूक करणे आवश्यक आहे.

१३] संस्थेविरुध्द कोणत्याही तक्रारी नसाव्यात व न्यायालयीन प्रकरणे नसावीत. शासनाने वेळोवेळी घालून दिलेले नियम व निकष यांचे संस्थेने तंतोतंत पालन करावे.

१४] ज्या महाविद्यालयांना आर्थिक वर्षात रुपये २५ लाख किंवा त्याहून अधिक रकमेचे अनुदान देय होईल अशा महाविद्यालयांनी सी. ए. जी. [डी. पी. सी. ]अधिनियम १९७१ मधील परिच्छेद १४ नुसार महालेखापाल यांच्या लेखापरीक्षा पथकाकडून लेखापरिक्षण करणे बंधनकारक राहील.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मधील महाविद्यालयांना सन १९९९-२००० मध्ये ५०%, परिशिष्ट "ब" मधील महाविद्यालयांना ७५% अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्या महाविद्यालयांना वेतनावर होणारा खर्च खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षाखाली दाखवून तो सन १९९९-२००० मधील आर्थिक तरतूदीमधून भागविण्यात यावा.

अर्थशिर्षक:-

"२२०२-सर्वसाधारण शिक्षण-०३-विद्यापीठीय उच्च शिक्षण १०४ अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य पंचवार्षिक योजनांतर्गत योजना १०४ [एक] [बी] अशासकीय वाड्.मय, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना विस्तारासाठी अनुदाने [२२०२०९०५] ४१ सहाय्यक अनुदाने मागणी क्रमांक डबल्यू-२".

तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्ट "क" मधील महाविद्यालयांना सन १९९९-२००० मध्ये १००% अनुदान मंजूर करण्यात आले आहे, त्या महाविद्यालयांना वेतनावर होणारा खर्च खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षाखाली दाखवून तो सन १९९९-२००० मधील आर्थिक तरतूदीमधून भागविण्यात यावा.

अर्थशिर्षक:-

"२२०२-सर्वसाधारण शिक्षण-०३-विद्यापीठीय उच्च शिक्षण १०४ अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य [एक][ए] अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य [एक] बिनसरकारी वाड्.मय, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदाने [२२०२०८७२] ४१ सहाय्यक अनुदाने मागणी क्रमांक डबल्यू-२".

शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण],
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति,

१. महसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे.
२. महालेखापाल [लेखापरीक्षा] महाराष्ट्र, मुंबई
३. महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
५. प्राचार्य, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती.
६. प्राचार्य, पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील कला, विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे.
७. प्राचार्य, शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर, मालेगांव बु।। ता. बारामती, जि. पुणे.
८. प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिडको, नाशिक
९. प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे.
१०. प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, पौड, रोड, पुणे.
११. प्राचार्य, एच.व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे.
१२. प्राचार्य, समाजभूषण बाबुराव ऊर्फ अण्णासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे
१३. प्राचार्य, टाकळी ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर जि. अहमदनगर
१४. प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, ता. जुन्नर, जि. पुणे
१५. प्राचार्य, कला, विज्ञान महाविद्यालय, नारायणगांव, जि. पुणे
१६. प्राचार्य, बाबुराव घोलप महाविद्यालय, सांगवी, जि. पुणे.
१७. प्राचार्य, गोपीनाथ कला व विज्ञान महाविद्यालय, वरवंड, ता. दौंड, जि. पुणे.
१८. प्राचार्य, इंद्रायणी महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, ता. वडगांव मावळ, जि. पुणे
१९. प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर.
२०. प्राचार्य, श्री.आनंद कॉलेज ऑफ सायन्स, पाथर्डी, जि. अहमदनगर.
२१. प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, जि. पुणे.

एसके/२५१२०००

अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांना/विद्याशाखांना सन १९९९-२००० मध्ये ५० टक्के अनुदान मंजूर केलेल्या महाविद्यालयांची/विद्याशाखांची यादी.

## परिशिष्ट "अ"

| अ.क्र. | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | अनुदानावर आणण्यात आलेल्या विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | विद्याशाखा | | |
| १. | विद्या प्रतिष्ठान संस्था, बारामती. | कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती | कला, विज्ञान प्रत्येकी १ तुकडी |
| २. | डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान, अजिंक्यतारा, कोल्हापूर. | पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पिंपरी, पुणे. | कला, वाणिज्य विज्ञान १ तुकडी [प्रत्येकी] |
| ३. | ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती. | शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर, मालेगांव बु।।, ता. बारामती, जि. पुणे. | विज्ञान १ तुकडी |

शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण],
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

महाविद्यालयांना/विद्याशाखांना सन १९९९-२००० मध्ये ७५ टक्के अनुदान मंजूर केलेल्या महाविद्यालयांची/विद्याशाखांची यादी.

## परिशिष्ट "ब"

| अ.क्र. | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | अनुदानावर आणण्यात आलेल्या विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १. | नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक. | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिडको, नाशिक. | वाणिज्य व विज्ञान प्रत्येकी १ तुकडी |
| २. | विद्याशाखा | | |
| २. | चाकण शिक्षण मंडळ, चाकण, ता. खेड, जि. पुणे | कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे | कला १ तुकडी |
| ३. | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे. | कला व वाणिज्य महाविद्यालय, पौड रोड, पुणे. | कला १ तुकडी |
| ४. | श्री. पुना गुजराथी केळवणी मंडळ, पुणे. | एच. व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे. | कला १ तुकडी |
| ३. | विद्याशाखा | | |
| ५. | श्री. शिवाजी मराठा सोसायटी, पुणे. | समाजभूषण बाबुराव ऊर्फ अण्णासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे. | कला १ तुकडी |
| ६. | अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज, अहमदनगर. | टाकळी ढोकेश्वर कला महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहमदनगर. | कला १ तुकडी. |

शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे.-१.

अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांना/विद्याशाखांना सन १९९९-२००० पासून १०० टक्के अनुदान मंजूर केलेल्या महाविद्यालयांची/विद्याशाखांची यादी.

## परिशिष्ट "क"

| अ.क्र. | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | अनुदानावर आणिण्यात आलेल्या विद्याशाखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक. | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिडको, नाशिक | कला १ तुकडी |
| २. | श्री. पुना गुजराथी केळवणी मंडळ, पुणे. | एच. व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे | विज्ञान १ तुकडी |
| ३. | ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ, नारायणगांव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, ता. जुन्नर जि. पुणे. | कला व वाणिज्य प्रत्येकी १ तुकडी. |
| ४. | ग्रामोन्नती मंडळ, नारायणगांव, जि. पुणे. | कला, विज्ञान महाविद्यालय, नारायणगांव, जि. पुणे | कला १ तुकडी |
| ५. | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे. | बाबुराव घोलप महाविद्यालय, सांगवी, जि. पुणे. | कला १ तुकडी |
| ६. | वरवंड ग्रामशिक्षण संस्था, | गोपीनाथ कला व विज्ञान महाविद्यालय, वरवंड, ता. दौण्ड, जि. पुणे. | कला १ तुकडी |
| ब. | विद्याशाखा | | |
| ७. | | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, ता. वडगांव मावळ, जि. पुणे. | कला १ तुकडी |

..२..

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ८. | मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई, जि. अहमदनगर. | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर. | विज्ञान १ तुकडी |
| ९. | श्री. तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ, पाथर्डी, जि. अहमदनगर. | श्री. आनंद कॉलेज ऑफ सायन्स, पाथर्डी, जि. अहमदनगर. | विज्ञान १ तुकडी. |
| १०. | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पौड रोड, पुणे. | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, जि. पुणे. | विज्ञान १ तुकडी |

शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण],
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.